नि.फौ.ख. क्रमांक. ३३/२०२५
सरकार विरुध्द श्रीनिवास व इतर
निशाणी क्रमांक – २३.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव –भाग्यश्री श्रीनिवास चिल्लमे,
वय -२६ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. बुधोडा, ता.औसा, जि.लातूर.
हा.मु. वंजारवाडी, ता. अहमदपूर, जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन.काकडे</u>**

**०१.** आरोपी क्र.०१ श्रीनिवास माझा पती आहे. आरोपी क्र.२ ही माझी नणंद आहे, आरोपी क्र.३ गोविंद हे सासरे आहेत. आरोपी क्र.४ मेघा ही मयत आहे. माझा विवाह आरोपी क्र.०१ सोबत दि.०९/०५/२०२३ रोजी बुधोडा येथे झाला होता. आरोपींसोबत माझा किरकोळ वाद झाला होता. त्याशिवाय कोणतीही घटना झाली नव्हती. मी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. मला फिर्यादीतील मजकुर माहिती नाही. आता मला फिर्याद दाखवली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराची मला माहिती नाही. फिर्यादीला सहीपुरती **<u>नि.क्र.२४</u>** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, सासरच्या लोकांनी मला सुरुवातीचे एक वर्षेच चांगले नांदविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर छोटया-मोठया कारणांवरुन त्रास देण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, स्वयंपाक येत नाही म्हणून मला आरोपी त्रास देत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला माहेरी माहिती सांगितल्यास जिवे मारु अशी धमकी देत असत. हे म्हणणे खरे नाही की, माझी नणंदही मला शारिरीक व मानसिक त्रास देत होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्याकडे डायलीसीस मशीनच्या व्यवसायासाठी रक्कम रुपये पाच लाख रुपये मागणी करीत होते व त्या कारणावरुन मला मारहाण करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीने मला दि.०३/१०/२०२४ रोजी मारहाण केली होती. आता मला फिर्यादीतील भाग अ वाचून दाखविला त्यातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझे आपसात मिटलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.ए.आर.नवटक्के यांच्यामार्फत सुरु:-</u>**

**०३.** उलटतपास नाकारला.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -१६.०४.२०२६

नि.फौ.ख. क्रमांक. ३३/२०२५<br>सरकार विरुध्द श्रीनिवास व इतर<br>निशाणी क्रमांक – २५.

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव –अरुण रामकिशन चोले,
वय -६० वर्षे, धंदा - शेती,
रा. वंजारवाडी, ता. अहमदपूर, जि.लातूर.

<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन.काकडे</u>

**०१.** फिर्यादी माझी मुलगी आहे. आरोपी क्र.०१ श्रीनिवास माझ्या मुलीचा पती आहे. आरोपी क्र.२ ही तिची नणंद आहे, आरोपी क्र.३ गोविंद हे तिचे सासरे आहेत. आरोपी क्र.४ मेघा ही मयत आहे. फिर्यादीचा विवाह आरोपी क्र.०१ सोबत दि.०९/०५/२०२३ रोजी बुधोडा येथे झाला होता. आरोपींसोबत तिचा किरकोळ वाद झाला होता. त्याशिवाय कोणतीही घटना झाली नव्हती. पोलिसांनी माझे टिपन नोंदविले नव्हते.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, सासरच्या लोकांनी फिर्यादीला सुरुवातीचे एक वर्षेच चांगले नांदविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर फिर्यादीला छोटया-मोठया कारणांवरुन त्रास देण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला स्वयंपाक येत नाही म्हणून आरोपी त्रास देत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी फिर्यादीला माहेरी माहिती सांगितल्यास जिवे मारु अशी धमकी देत असत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीची नणंदही तिला शारिरीक व मानसिक त्रास देत होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी फिर्यादीकडे डायलीसीस मशीनच्या व्यवसायासाठी रक्कम रुपये पाच लाख रुपये मागणी करीत होते व त्या कारणावरुन तिला मारहाण करीत होते. आता मला जबाबातील भाग अ वाचून दाखविला त्यातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचे आपसात मिटलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.ए.आर.नवटक्के यांच्यामार्फत सुरु</u>:-

**०३.** उलटतपास नाकारला.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,<br><br>स्वाक्षरीत/-<br><br>**( आर.डी. वाबळे )**<br>अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,<br>अहमदपूर.

दिनांक -१६.०४.२०२६